# पूर

एकदा अवेळी काय झाले, झोपेतून मी जागा झालो
अन् माझी कवितेची वही मी शोधू लागलो
माझ्या पायाला पाणी लागल्याचे जाणवले
माझ्याच कवितेमधील नदीच्या पुराचे पाणी घरात शिरले
पुराच्या पाण्यात मी बुडणार असे वाटले
तरण्यासाठी विचारांचा आसरा, कल्पनांचा दोरा
शब्दांचा पूल दिसतो का शोधू लागलो
कल्पनेची सुंदर नाव तोच तरंगताना दिसली
उडी टाकून तरंगणारी नाव मी धरली
तेव्हा त्यात मला ओल्या वहीची पाने दिसली
अधीरतेने मी वाचायला लागलो
आश्चर्याने मी थक्क झालो !
त्यावर लिहिलं होतं,
'झोपी गेलेला जागा झाला !'

**– पद्‌माकर चित्रे**
**('शब्दांची फुलपाखरे' या कवितासंग्रहातून)**